<u>नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१० मधील नि.१५८ वरील आदेश</u>
(गुराप्पा घेज्ञी वगैरे वि. बाबु नागराळे वगैरे)
**(CNR No.MHSN080002222010)**

प्रतिवादी यांनी दाखल केलेला प्रतिदावा वगळणेकरिता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६-ग अन्वये दाखल केलेला आहे. वादी यांच्या कथनानुसार, त्यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ ते ८ यांच्या विरुध्द त्यांनी वादीच्या कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये अशा प्रकारच्या मर्यादीत मागणीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.३० कडे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास प्रतिदावा देखील दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्यामध्ये, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांच्या गट क्र.९०४ मध्ये वादी यांनी अतिक्रमण केलेले असून सदर अतिक्रमण काढून त्याचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेकामी प्रतिदावा केलेला आहे. तथापी, सदर प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी अन्य तीन प्रतिवादींना म्हणजेच प्रतिवादी क्र.६ ते ८ यांना समाविष्ट करुन वेगवेगळया मागण्या केलेल्या आहे. न्यायालयीन आयुक्त यांचा नि.१४३ कडील नकाशा व अहवालानुसार, वादी क्र.१ ते ४ व प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या जमीन गट क्र.९०४ मध्ये पश्चिमेकडून १२.५७ आर इतक्या क्षेत्राचे अतिक्रमण केलेले आहे. सदरचे अतिक्रमीत क्षेत्र ड-क-ग-ख या अदयाक्षरांनी दर्शविलेले आहे. तसेच २.७४ आर इतके अतिक्रमीत क्षेत्र अ-ब-क-ड या अदयाक्षरांनी दर्शविलेले आहे. अशाप्रकारे दरम्यानचे उत्पन्नासह दोन्ही अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना दयावा अशाप्रकारची मागणी प्रतिदाव्यामध्ये केलेली आहे.

२. वादी यांनी पुढे असे कथन केले की, वास्तविक पाहता, प्रतिदाव्यामध्ये केलेली मागणी ही केवळ वादी यांच्या विरुध्द मागता येईल. अशाप्रकारची मागणी एका प्रतिवादीने दुसऱ्या प्रतिवादी विरुध्द प्रतिदाव्याच्या स्वरुपात करता येणार नाही. वाद मिळकत ही वादी यांच्या मालकीची असून ती त्यांच्या कब्जात आहे, याबाबत प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये कोणतीही तक्रार घेतलेली नाही. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला किंवा कसे एवढाच मुद्दा या कामी विचाराधीन आहे. तथापी, प्रतिदावा दाखल करुन प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नव्याने गट क्र.९०४ ही मिळकत

सामिल केलेली आहे. सदरची मिळकत ही दाव्याचा वाद विषय नाही. त्यामुळे, प्रतिवादी यांनी दाखल केलेला प्रतिदावा हा कायदयातील तरतुदींच्या विरुध्द आहेत. मुद्दे निश्चित करण्यापुर्वी दि.प्र.सं. आदेश ८ नियम ६-ग अन्वये प्रतिदावा केंव्हाही वगळता येईल. दिनांक २२.०१.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.१५४ कडे अतिरिक्त मुद्दा निश्चित करणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. त्याअनुषंगाने वादी यांनी नि.१५६ कडे त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यामुळे, मुद्दे अदयापही निश्चित झालेले नाहीत हे या ठिकाणी स्पष्ट होते. त्यामुळे, अर्ज मंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.१६१ कडे त्यांचे सविस्तर म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी वादीच्या अर्जातील कथने अमान्य केलेली आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या कथनानुसार, त्यांनी प्रतिदाव्यामार्फत ज्या प्रतिवादी विरुध्द अनुतोष मागितला आहे ते वादीचे दाव्यातील प्रतिवादी नसून प्रतिदाव्यातील प्रतिवादी आहेत. प्रस्तूत कामी दिनांक ०८.०१.२०१४ रोजी नि.६४ कडे मुद्दे निश्चित करणेत आलेले आहेत. वादी यांचा पुरावा संपला असून त्या अनुषंगाने त्यांनी नि.९५ कडे पुरशिस दाखल केली आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी दिनांक ०७.१२.२०१६ रोजी त्यांचा पुरावा सुरु केला असून अदयापपावेतो त्यांचेतर्फे तीन साक्षीदार तपासणेत आलेले आहेत. दरम्यानचे काळात न्यायालयीन आयुक्ताचा अहवाल प्राप्त झाला. सदर अहवालामध्ये वादी यांनी प्रतिवादींचे क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. सदरचे अतिक्रमीत क्षेत्र प्रतिवादींना दयावे लागू नये म्हणून वादी यांनी प्रस्तुतचा दावा जलद गतीने दाखल केला असून त्यास प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत व प्रतिदावा देखील दाखल केलेला आहे. प्रतिदाव्यास वादींनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या म्हणण्यानुसार, कायदयातील तरतुदीनुसार मुद्दे निश्चित करण्यापुर्वी प्रतिदावा वगळता येईल. तथापी, दिनांक ०८.०१.२०१४ रोजी मुद्दे निश्चित केले असून त्यानंतर जवळपास ११ वर्षानंतर म्हणजेच दिनांक ०५.०१.२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही. प्रतिवादी यांनी नि.१५४ कडे दिलेला अर्ज हा मुद्दे निश्चितीकरिता नसून निश्चित करणेत आलेल्या मुद्दयामध्ये दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे, प्रस्तूत प्रकरणामध्ये मुद्दे निश्चित करणेत आले नसलेबाबतचे वादींनी केलेले कथन स्विकाराई वाटत नाही. वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती

एकमेकांलगत आहेत. वादी यांनी प्रतिवादींचे क्षेत्र अतिक्रमण केलेची बाब स्पष्ट झालेली आहे. त्यामुळे, सदर दाव्यामध्येच त्याबाबतचा विषय एकत्रीत चालणे आवश्यक आहे. म्हणून, प्रतिवादींना प्रतिदावा करणे भाग पडले आहे. त्याकरिता, स्वतंत्र दावा करणेची आवश्यकता मुळीच नाही. वादी यांनी दावेचे कामकाज प्रलंबित ठेवणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वरील सर्व कारणास्तव अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

६. वादीचे प्रामुख्याने कथन असे आहे की, सदर दाव्यात अदयाप मुद्दे निश्चित केलेले नाहीत. दावा मुद्देकरिता प्रलंबित असल्याने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ८ नियम ६-ग अन्वये प्रतिदाव्याने मूळ दाव्यात गुंतागूंत निर्माण होत असेल तर प्रतिदावा वगळण्याची तरतूद आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज निकाली काढण्याकरिता त्या तरतुदीचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

<u>दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६-ग ची तरतूद खालीलप्रमाणे आहे</u>.

प्रतिवादीने प्रतिवादार्थ प्रतिहक्कमागणी सादर केल्यास आणि त्याद्वारे प्रस्तूत केलेल्या हक्कमागणीचा निकाल प्रतिहक्कमागणी म्हणून नव्हे तर स्वतंत्र दाव्यामध्ये करावयास हवा असे वादीचे म्हणणे असल्यास, प्रतिहक्कमागणी संबंधातील वादमुद्दे निश्चित करण्यात येण्यापुर्वी कोणत्याही वेळी वादी अशी मागणी वगळण्यात यावी अशा अर्थाच्या आदेशासाठी न्यायालयाकडे अर्ज करु शकेल आणि अशा अर्जाची सुनावणी केल्यानंतर न्यायालयास योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

७. वरील तरतुदीचे अवलोकन केले असता, वादमुद्दे निश्चित करण्यात येण्यापुर्वी कोणत्याही वेळी अर्जाची सुनावणी केल्यानंतर प्रतिदाव्याची मागणी वगळता येईल. त्या अनुषंगाने या ठिकाणी नमूद करणे गरजेचे वाटते की, वादीच्या दाव्यास प्रतिवादी यांनी दिनांक ०८.०७.२०१० रोजी नि.३० अन्वये कैफियत दाखल करुन वादी व प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे गट क्र.९०४ मध्ये अतिक्रमण करु नये म्हणून त्यांचे विरुध्द निरंतर ताकीदीकरिता तसेच वादी व प्रतिवादी क्र.६ यांचेकडून त्यांनी गट क्र.९०४ मध्ये केलेल्या अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळावा व दरम्यानचे उत्पन्न मिळावे म्हणून प्रतिदावा दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास वादी यांनी दिनांक २२.१२.२०१० रोजी व

प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी दिनांक १४.०९.२०११ रोजी आपापले म्हणणे दाखल केलेले आहे. प्रथमतः दिनांक ०८.०१.२०१४ रोजी नि.६४ कडे मुद्दे निश्चित करण्यात आले असून प्रतिदाव्यास अनुसरुन दिनांक २४.०८.२०१६ रोजी सदरचे मुद्दे नव्याने निश्चित करण्यात आले. त्यानंतर वादी यांनी त्यांचा पुरावा संपलेबाबतची पुरशिस दिनांक २३.११.२०१६ रोजी दाखल केली. प्रतिवादीतर्फे दोन साक्षीदार तपासणेत आलेले असून तिसऱ्या साक्षीदाराचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक १५.०२.२०१७ रोजी दाखल करण्यात आलेले आहे. त्यानंतर दिनांक २२.०१.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी मोजणी अहवालाच्या अनुषंगाने नि.१५४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुद्दे दुरुस्तीकरिता व नव्याने मुद्दे निश्चित करणेकरिता अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज अदयाप न्यायप्रविष्ट आहे. तथापी, सदरहू प्रकरणामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे अगोदरच मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहेत. नि.१५४ कडील अर्ज हा निघालेल्या मुद्दयामध्ये दुरुस्तीकरिता व आणखी नव्याने मुद्दे निश्चित करण्याकरिता दिलेला आहे. त्यामुळे, मुद्द निघालेलेच नाहीत असा निष्कर्ष या घडीला काढता येणार नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणामध्ये मुद्दे निश्चित करणेत आलेले नाहीत हे वादींचे कथन स्विकारार्ह वाटत नाही.

८. वादी यांनी दुसरी हरकत अशी घेतली आहे की, प्रतिदाव्यामध्ये केलेली मागणी ही केवळ वादी यांच्या विरुध्द मागता येईल. अशाप्रकारची मागणी एका प्रतिवादीने दुसऱ्या प्रतिवादी विरुध्द प्रतिदाव्याच्या स्वरुपात करता येणार नाही. प्रतिदावा दाखल करुन प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नव्याने गट क्र.९०४ ही मिळकत सामिल केलेली आहे. सदरची मिळकत ही दाव्याचा वाद विषय नाही. सदर प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी अन्य तीन प्रतिवादींना म्हणजेच प्रतिवादी क्र.६ ते ८ यांना समाविष्ट करुन वेगवेगळया मागण्या केलेल्या आहे. या अनुषंगाने या ठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी प्रतिदावा दाखल करुन प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे गट क्र.९०४ मध्ये अतिक्रमण करु नये म्हणून त्यांचे विरुध्द निरंतर ताकीदीकरिता तसेच वादी व प्रतिवादी क्र.६ यांचेकडून अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळावा व दरम्यानचे उत्पन्न मिळावे म्हणून मागणी केलेली आहे. कायदयाच्या प्रचलित तत्वानुसार जर एखादा पक्षकार दाव्याचे कामी समाविष्ट असेल तरच त्याचे विरुध्द दाद मागता येईल, अन्यथा मागता येणार नाही. प्रतिवादी क्र.७ व ८

या वादीच्या बहिणी असून त्यांचे गट क्र.९४४, ९४५ मध्ये हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी प्रतिवादी क्र.६ ते ८ यांना ते प्रतिदाव्यास आवश्यक पक्षकार असलेने प्रतिवादी म्हणून सामील केल्याचे दिसून येते. जर प्रतिवादी यांचा प्रतिदावा वगळला तर त्याचा दाव्याच्या गुणदोषावर विपरीत परिणाम होवू शकतो. वरील सर्व कारणास्तव वादीचा अर्ज नामंजूरीस पात्र ठरतो. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2025.11.20 13:53:25 +0530

जत. (प्रकाश चु. बछले)
दिनांकः-१२.११.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जत.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

Name of the Stenographer. : R. B. Samalewale (Grade-III)
Court. : P. C. Bachhale, J.M.F.C., Jath.
Date. :12.11.2025
Judgment signed by the
Presiding Officer on. :20.11.2025

Judgment uploaded on. :20.11.2025